दै. पुढारी - ८/१२/२०१५

# केरमधील 'देवाच्या झाडाचे' होणार शास्त्रीय संशोध

## मुंबई विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाचा पुढाकार

दोडामार्ग : प्रतिनिधी

दोडामार्ग तालुक्यातील केर या गावी असलेल्या पुरातन वृक्षाचा अभ्यास मुंबई विद्यापीठाच्या वतीने करण्यात येणार आहे. तालुक्यात या प्रजातीच्या हा एकमेव वृक्ष आहे. त्याचे नाव स्थानिकांना माहीत नाही. ग्रामस्थ त्याला 'देवाचे झाड' म्हणून ओळखतात. रविवारी गोव्याचे वन व पर्यावरणमंत्री राजेंद्र आर्लेकर व मुंबई विद्यापीठाच्या विकास मंडळाचे संचालक डॉ. अनिल पाटील व विद्यार्थ्यांनी या झाडाला भेट देऊन पाने, फळे, फुले, बिया असे नमुने अभ्यासासाठी गोळा केले.

केर गावात हा महाकाय दुर्मिळ वृक्ष शतकानुशतके उभा आहे. त्या प्रजातीतील तो एकमेव वृक्ष असून अशा प्रकारचा वृक्ष आसपासच्या परिसरात कोठेही सापडत नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. या वृक्षाला करवंदासारखी छोटी फळे येतात; परंतु त्याच्या बियांपासून पुनर्उत्पादन होत नसल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. केर गावात मुंबई विद्यापीठाच्या पर्यावरण विभागाचे राज्यस्तरीय निवासी अभ्यासी शिबिर सुरू आहे. रविवारी या शिबिराचा प्रारंभ गोव्याचे वन व पर्यावरणमंत्री राजेंद्र आर्लेकर यांच्या हस्ते झाला.

### झाडाची फांदी कधीही वाळत किंवा मोडत नाह

विशेष म्हणजे स्थानिक वयोवृद्ध ग्रामस्थांच्या माहितीनुसार त्यांच्या हयातीत या वृक्षाची फांदी कधीही वाळून वा मोडून पडलेली त्यांनी पाहिली नाही. ही अद्‌भूत माहिती ऐकून उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापकांनी हा संशोधनासाठी आव्हानात्मक विषय असल्याचे सांगितले.